# यावल महाविद्यालयात बायोडायव्हर्सिटी दिन साजरा

यावल (वार्ताहर) कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दिनांक 22 मे 2021 रोजी विज्ञान विभागाअंतर्गत बायोडायव्हर्सिटी दिनानिमित्त सामान्यज्ञान चाचणी परीक्षा प्राचार्या डॉ.संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली. सदर परीक्षेला 69 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला बायोडायव्हर्सिटी परीक्षेत प्रथम साहिल तडवी, द्वितीय भरत वानखेडे व तृतीय वैशाली पाटील या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.

बायोडायव्हर्सिटी सामान्य ज्ञान चाचणी परीक्षेचे संयोजक म्हणून प्राणीशास्त्र विभाग प्रा. मयूर सोनवणे व संगणक विभाग प्रा. ईश्वर पाटील यांनी काम केले. ऑनलाइन परीक्षा यशस्वीरित्या संपन्न होण्याकरिता विज्ञान विभागातील सर्व शिक्षक  व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.